दिव्य मराठी 20.1.25

# खंडेलवाल महाविद्यालयाच्या सायबर वॉरियर्सचा सन्मान

## संजय सपकाळ, अनिकेत भुडके यांना पुणे येथील कार्यक्रमात करण्यात आले सन्मानित

प्रतिनिधी | अकोला

सायबर शिक्षा सायबर सुरक्षेसाठी क्विक हिल फाउंडेशनतर्फे दिल्या जाणाऱ्या सायबर शिक्षा सायबर सुरक्षा या पुरस्कारांचे पुणे येथे राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते वितरण करण्यात आले. अकोला येथील शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालयाच्या सायबर वॉरियर्स सुमित संजय सपकाळ व अनिकेत भुडके यांना प्रथम क्रमांक मिळाला असून, त्याना सन्मान चिन्ह व प्रमाणपत्र देवून सन्मानित करण्यात आले.

कार्यशाळा, शिबिर, सेमिनार, गेस्ट लेक्चर्स, पी.पी.टी. प्रेझेंटेशन्स अशा नावीन्यपूर्ण उपक्रमाच्या माध्यमातून सायबर जनजागृती अभियान राबवण्यात आले. महाविद्यालयातील २० स्वयंसेवकांनी सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा हे विविध शाळा आणि महाविद्यालये, बचत गट, मंदिर, बस स्थानक, रेल्वेस्टेशन, हॉस्पिटल्स, अपार्टमेंट्स, शासकीय, निमशासकीय कार्यालये अशा सार्वजनिक ठिकाणी जाऊन जागृत करण्याचे कार्य केले आहेत. विविध सोशल मीडिया, गेम्स, फेक कॉल्स, फेक मेसेजेस, लॉटरी फ्रॉड, लोन फ्रॉडच्या माध्यमातून दिवसेंदिवस वाढत असलेले ऑनलाईन गुन्हे, इंटरनेट, मोबाइल फोनच्या माध्यमातून होत असलेली फसवणूक कमी करण्याच्या उद्देशाने समन्वयक डॉ.हरिदास खरात आणि २० सायबर वॉरियर्स यांनी माहिती देऊन जागृती केली आहे.